बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव विज्ञान विद्याशाखेंतर्गत 'समाजशास्त्र' विषयातील
पीएच्.डी. (विद्यावाचस्पती) पदवीसाठी सादर करावयाचा
संशोधन आराखडा

संशोधक

मंगेश रामराव झोले

एम.ए., बी.एड.

मार्गदर्शक

प्रा.डॉ. विनोद व्ही. जाधव

समाजशास्त्र विभागप्रमुख

मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय,

औराद शहाजनी ता.निलंगा जि.लातूर

संशोधन केंद्र

सामाजिकशास्त्रे संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

डिसेंबर - 2024

बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन
(विशेष संदर्भ : लातूर जिल्हा)

प्रस्तावना:

भारत हा तरुणांचा देश म्हणून ओळखला जातो. जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणात श्रमिक पुरवठा करणारा देश म्हणून देखील प्रचलित आहे. भारतीय कामगारांचे वर्गीकरण करणे हे व्यवसायावरून करण्यात येते. १८ व्या शतकामध्ये औद्योगिक क्रांती होऊन कामगारांना चांगले दिवस येतील असे दिसले परंतु या औद्योगिक क्रांतीने कामगारांची शारिरीक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय पिळवणूक करण्यास खारी सुरुवात झाली असे म्हणावे लागेल. यानुसार कामगाराचे औद्योगिक कामगार, गिरणी कामगार, बांधकाम कामगार, वेठबिगार कामगार, हमाल, माथाडी कामगार असे विविध प्रकार पडतात. जगातील सर्वात जास्त कामगार हे शेती व्यवसायात गुंतलेले असून त्या खालोखाल बांधकाम व्यवसायाचा क्रमांक लागतो.[१] प्रस्तुत 'बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ: लातूर जिल्हा)' संशोधनातून बांधकाम कामगारांच्या समस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास करण्यात येईल.

संकल्पना:

'कामगार' हा शब्द अशा लोकाचे वर्णन करण्यासाठी वापरतात जे निम्नस्तरीयन कार्य करणाऱ्या आणि अनेकदा याचा विस्तार बेरोजगार किंवा कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांसंबंधी केला जातो. मुख्यतः कामगार वर्ग औद्योगिक अर्थव्यवस्था व गैर औद्योगिक अर्थव्यवस्था असणाऱ्या शहरात आढळला. सामाजिकदृष्ट्या कामगार शब्दाचा अनेक प्रकारच्या शब्द उपयोग केला जातो. कामगारांना अशा व्यक्तीच्या रुपात परिभाषित करतात जे मजुरीसाठी श्रम शक्ती विकून उत्पन्नचे स्वामित्व स्वत:कडे ठेवत नाही.

कार्ल मार्क्स यांच्या मतानुसार 'कामगार वर्ग शारीरिक स्वरुपात पूल, शिल्प, वास्तु इत्यादीचे निर्माण करतात. परंतु त्यांच्या जवळ स्वतःची मालमत्ता नसते. जे अत्यंत गरीब, बेरोजगार व अधिकतम बेघर असतात. सामंती युरोपमध्ये अधिकतर

लोक श्रमिक वर्ग, विभिन्न व्यापारी व व्यवसाय यापासून बनलेला समूहाचा भाग होत.'[२] याला विचारला बांधकाम कामगार अपवाद नाहीत.

इमारती किंवा इतर बांधकाम कामासंबंधी व्यवसायात कोणत्याही कौशल्याची, अर्धकुशल, अकुशल, हाताने करण्याची कामे, देखरेखीची तांत्रिक किंवा कारकुनी बांधकामा संबंधी कामे इत्यादी कामे करणाऱ्या कामगारांना बांधकाम कामगार म्हणतात. बांधकामासंबंधी कामे ही अतिशय कष्टकरी, काही यंत्राच्या साहाय्याने करावयाची असतात. यातील प्रक्रिया गतिशील, प्रसंगी वेळखाऊ आणि परस्परांशी निगडित असतात. बांधकाम क्षेत्रात विविध प्रकारची भिन्नता दिसते. कामगारांचे स्थलांतर नेहमी होत असते. बांधकाम कामगार हे सामाजिक दृष्ट्या मागासलेले आणि निरक्षर किंवा शिक्षित असतात. त्यांची सौदा करण्याची क्षमता कमी असते. तसेच कामाच्या ठिकाणी अपघातांचे धोके अधिक असतात. त्यामुळे अपघात होतात हे धोके शोधून त्यांची नोंद ठेवण्याचे प्रमाण अत्यल्प असल्याने बंधकाम कामगार यांची निश्चित अपघाता संबंधीची आकडेवारी मिळत नाही. त्याचबरोबर रोजगार नोंदणीकृत कमी असतात, बांधकामाच्या ठिकाणी(साइट्स) कमी मुदतीच्या असणे, कामगारांची आवक-जावक, उलाढाल मोठ्या प्रमाणावर होत असते.[३] तात्पुरत्या आणि स्थलांतरित मजुरांचे प्रमाण अधिक असणे त्यापैकी अनेकजण बांधकाम प्रक्रियांशी अनभिज्ञ असणे.

जागतिक पातळीवर भारताचे वेगळेपण निर्माण करण्यासाठी विविध महत्वाकांक्षी प्रकल्प राबण्यात येतात. या महत्वाकांक्षी प्रकल्पाची पूर्तता करण्यासाठी कामगार हा महत्वाची भूमिका पार पडतो. यामध्ये कुशल आणि अकुशल कामगारांचा समावेश होत असून कुशल कामगार आधुनिक तंत्रज्ञाचा वापर करतात आणि यामध्ये या स्पर्धेमध्ये बांधकाम कामगार हे पुढे असल्याचे दिसून येते. क्षेत्र कोणतेही असो बांधकाम हा विकासाचा प्रमुख धागा मानला जातो. परंतु त्या मानाने बांधकाम कामगार हा सामाजिक-आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समाजातील एक मोठा वर्ग आहे. कामगारांच्या दोन क्षेत्रापैकी संघटीत क्षेत्रापेक्षा असंघटीत क्षेत्रातील कामगारांच्या समस्या अधिक आहेत. संघटीत क्षेत्र जसे सरकारी व निम्न सरकारी कर्मचारी, महामंडळातील कर्मचारी, दहापेक्षा अधिक कामगार असणारे क्षेत्र इत्यादी आणि असंघटीत क्षेत्र शेतकरी, शेतमजूर, माथाडी कामगार, बांधकाम कामगार, भाजीपाला विक्रेते, घरेलू कामगार, फेरीवाले इत्यादी आहेत. या सर्वांमध्ये बांधकाम कामगार

असंघटित क्षेत्रातील अतिशोषित वर्ग मानला जातो. याचे कारण निरक्षरता, अकुशलता, व्यसनाधीनता, गरिबी, अज्ञान, वारंवार होणारे विस्थापन, कामाच्या ठिकणी असुरक्षितता, सामाजिक स्थान, किमान वेतन, आरोग्य, कामाची शाश्वती नसणे इत्यादी आहेत. सद्य:स्थितीत भारतातील सुमारे ३७.७ कोटी लोकसंख्या ही शहरात राहते, जी एकूण लोकसंखेच्या ३१ टक्के आहे. यानुसार भविष्यात २०३० साली शहरी लोकसंख्या वाढून ६०.६० कोटी पर्यंत वाढेल.[४.]

डार्विनचा उत्क्रांतीवादी सिद्धांत हा मानव सभ्यतेच्या विकासाचा सिद्धांत आहे. त्यानुसार मानव विकास होऊन मानव टोळ्या व समूहाच्या स्वरुपात आश्रयाच्या शोधात एका विशिष्ठ टिकाणी वास्तव्याची सुरवात केली. मानवी आश्रयस्थान सुरुवातीच्या काळात साधे सोपे होते आणि त्या आश्रयस्थानाचा टिकाऊपणा कमी असायचा. कालांतराने मानवाने अधिकाधिक प्रगती साध्य करून शेतीचा विकास केला तेव्हा लोक दीर्घकाळ एकाच ठिकाणी राहू लागले. त्यासाठी निवारास्थान निर्माण केली जाऊ लागली. या निवारा स्थानामध्ये लोक निवारा व्यतिरिक्त अन्न साठवणे, समारंभ इत्यादी उपयोगी कार्यासाठी वापरत. त्याचबरोबर शिल्पकला, वास्तुकला, लेणी इत्यादी वस्तू या प्रतिकात्मक व कार्यात्मक स्वरूपात विकसित झाल्या.

आधुनिक तंत्रज्ञानाच्या वापरामुळे सद्य:स्थितीला इमारतीचे महत्त्व हे वेगवेगळ्या पद्धतीने विकसित होत आहे त्यामध्ये प्रतिष्ठेची बाब आणि भौतिक सुविधांचा समावेश होतो. इमारतींना त्यांच्या भौतिक सुविधांमुळे अधिक महत्त्व प्राप्त होत आहे याचबरोबर इमारतच्या आतील भागात वापरल्या जाणाऱ्या साधनांचा योग्य वापर करून हवेचे तापमान नियंत्रित करणे, प्रकाश, ध्वनी पातळी, आर्द्रता, हवेचा वेग आणि मानवी आराम निर्माण करणारे उपयोगात्मक घटक यांचा अधिकाधिक अचूक प्रमाणात वापर करणे सहज शक्य झाले आहे. बांधकाम कामगार विविध कौशल्याचा वापर करून बांधकामाचे सुशोभीकरण करतात परंतु या प्रवाहामध्ये बांधकामगारांनी कामाची उत्कृष्ट वाढण्यासाठी घेतलेल्या मेहनतीचा मोबदला मात्र ठेकेदार आणि मालक वर्ग वापरून त्यांचे शोषण करतो.

बांधकाम क्षेत्र हे भारतीय विकासाच्या दृष्टीने महत्वाचे आहे. बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांच्या संदर्भाने कामगार हे अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असल्याचे पहावयास मिळते. याचे कारण म्हणजे कुशल, अर्धकुशल किंवा अकुशल अशा सर्व

कामगारांना रोजगाराच्या संधी बांधकाम क्षेत्र सहज उपलब्ध होत असतात तसेच बांधकाम कामगार म्हणून काम करण्यासाठी किमान किंवा कमाल शिक्षणाची कोणतीही अट नाही, निरक्षर आणि उच्च विद्याविभूषित अशा सर्व शैक्षणिक पात्रतेचे व विविध सामाजिक स्तरातील कामगार इतर रोजगाराच्या संधी अभावी बांधकाम क्षेत्राकडे ओढले जात आहेत. परंतु बांधकाम कामगार हा असंघटित क्षेत्रातील असुरक्षित घटक मानला जातो. इतरांच्या स्वप्नपूर्तीचे मजले उभे करत असताना बांधकाम कामगार झिजत राहून स्वतः धोकादायक परिस्थितीत सिमेंट, वाळू, विटा आपल्या डोक्यावर घेऊन अनेक मजले चढवत जात असतो. यामुळे त्यांच्या जिवितास व आरोग्यास गंभीर धोके निर्माण होत असतात. दिल्ली, मुंबई, पुणे, औरंगाबाद यासारख्या मोठ्या शहरांमध्ये काम करणारे बहुतेक बांधकाम कामगार परप्रांतीय आहेत. उदाहरणार्थ बिहार, झारखंड, उत्तर प्रदेश, ओरिसा, पश्चिम बंगाल, छत्तीसगड, राजस्थान आणि इतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल प्रदेशातील भूमिहीन मजूर आहेत. त्याच प्रमाणात महाराष्ट्रात बांधकाम कामगार म्हणून इतर राज्यात किंवा मोठ्या शहरांकडे रोजगार शोधात येतात. सामाजिकदृष्ट्या बांधकाम कामगारांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि इतर दलित यांचा समावेश जास्त असल्याचे दिसते.[१] त्याचप्रमाणे काही बांधकाम कामगार हे उपजीविकेसाठी काम करतात तर काही कामगार हे अधिकचे उत्पन्न मिळावे याकरिता शेतीच व इतर हंगाम बंद असताना शहरात बांधकाम कामगार म्हणून काम करण्यास येतात हे असंघटित क्षेत्रातील बहुतांश बांधकाम कामगार हे सामाजिक-आर्थिक दृष्ट्या वंचित असल्याचे आहेत.

बांधकाम कामगाराला सतत विविध जोखमीची कामे करावी लागतात. त्यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो. शारीरिक अतिश्रम, पुनरावृत्ती होणारी कार्ये, दीर्घकाळ उभे राहणे किंवा विचित्र स्थितीत काम करणे यामुळे वेदना किंवा दुखापत. तसेच शिसे, लाकूड, धूळ, एस्बेस्टोस, पेंट्स, सॉल्व्हेंट्स आणि इतर विषारी रसायने किंवा सामग्रीचा संपर्क येणे, अत्यंत तापमान आणि अतिनील किरणोत्सर्गामध्ये काम करणे, प्रतिकूल हवामानात काम करणे जसे की थंडी, उष्णता, जोराचा वारा किंवा विजा, हँड टूल्स, पॉवर्ड टूल्स आणि जड पॉवर उपकरणांसह कार्य करणे, याचबरोबर हात, बाहू किंवा शरीरात उर्जायुक्त साधने किंवा उपकरणे यांचे जास्त कंपन, बंदिस्त जागा, अतिआवाज, उंचीवर काम करणे, पोर्टेबल शिडी आणि निश्चित शिडीसह कार्य करणे,

विद्युत धोके. क्रेन, होइस्ट आणि इतर सामग्री हाताळणी उपकरणांसह कार्य करणे, स्लिप्स, ट्रिप आणि फॉल्स, लाकूड धूळ पासून श्वसन धोके, ज्वलनशील धुळीपासून स्फोट आणि आगीचे धोके, काम शिफ्ट किंवा कामाचे दिवस वाढल्यामुळे मानसिक तान, एकटे काम करत राहणे, घराची चांगली देखभाल करणे, कामाच्या ठिकाणी हिंसा आणि छळ इत्यादी प्रकारामध्ये बांधकाम करत असताना बांधकाम कामगाराला एकट्यालाच वरील समस्यांना तोंड द्यावे लागते.[६.]

भारताच्या एकूण कामगार संख्येच्या दृष्टीने संघटित क्षेत्रात काम करणारे कामगार हे १० टक्के पेक्षा कमी असल्याचे दिसते म्हणजे एकूण कामगारांपैकी ९० टक्के कामगार हे असंघटित क्षेत्रात कार्य करतात ही लोकसंख्येच्या दृष्टीने ४० कोटी लोकसंख्या अंदाजित सांगता येते सन १९८१ मध्ये ८९ टक्के असंघटित कामगार होते ते वाढून १९९५ मध्ये ९२.५ टक्के इतके झाले.[७.]

सन २००१ च्या जनगणनेनुसार महाराष्ट्र राज्यात एकुण सुमारे १४.०९ लाख इतके बांधकाम कामगार होते. यामध्ये अधिकृत आकडेवारी जाहीर झाली नाही. सन २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्येत १५.९९ टक्के झालेली वाढ विचारात घेता ढोबळमानाने बांधकाम कामगारांची संख्या १७.५० लाख इतकी अपेक्षित आहे. राज्यात नोव्हेंबर २०१६ अखेर ५.६२ लाख बांधकाम कामगारांची लाभार्थी म्हणून मंडळात नोंदणी झाली असून त्यातील २.९९ लाख कामगारांची नोंदणी जीवित आहे.[८.]

बांधकाम कामगाराची संख्या ठरवणे ही सद्य:स्थितीमध्ये एक अडचणीची बाब असली तरीही कामानुसार बांधकाम क्षेत्रामध्ये येणारे वीटभट्टी कामगारांपासून ते मोठ्या कन्स्ट्रक्शन पर्यंत सर्वांनाच बांधकाम कामगार म्हणून ओळखले जाते. यानुसार बांधकाम कामगार नोंदणी ही तारेवरची कसरत असल्याचे आढळून येते. परंतु २०१८-१९ सालामध्ये घेण्यात आलेल्या विशेष नोंदणी अभियानामध्ये ४.६७ लक्ष बांधकाम कामगारांची नोंद करण्यात आली आहे. याशिवाय उपाययोजना माध्यमातून व कार्यालयात नियमित स्वरूपात येणारे एकूण १६.१० दशलक्ष कामगार यांची नोंद करण्यात आलेली आहे. सन २०१९ सालापर्यंत महामंडळात बांधकाम कामगारांची संख्या ही १६.१ दशलक्ष एवढी शासकीय पातळीवर नोंद झाल्याचे आढळून येते. तसेच नोव्हेंबर २०१९ पर्यंत कामगारांच्या नोंदीमध्ये २०,६७,७५८ इतक्या बांधकाम कामगारांची मंडळाकडे लाभार्थी म्हणून नोंदणीकृत असल्याचे अधिकृत संकेतस्थळावर दर्शवण्यात

येते.[९] सदरील माहितीच्या आधारे असे दिसून येते की, बांधकाम क्षेत्रामध्ये बांधकाम करणाऱ्या बांधकाम कामगारांची संख्याही रोजगाराची संधीशोधक वाढत जात आहे म्हणून प्रस्तुत 'बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ लातूर जिल्हा)' या संशोधनातून लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या सामाजिक परिस्थितीचे अध्ययन करण्यात येणार आहे.

पूर्व संशोधन साहित्याचा आढावा

संशोधन कार्य हे पूर्व संशोधन साहित्याचा आधार घेऊन आखणी करावे लागते त्या संदर्भाने प्रस्तुत प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील संशोधन साहित्याचा अभ्यास करण्यात आला.

1. **रंगलक्ष्मी एस. (२०१९)** रंगलक्ष्मी यांनी "एम्प्लॉयमेंट इन्कम अँड हेल्थ केअर एक्सपेंडिचर ऑफ कन्स्ट्रक्शन वर्कर इन तिरुचापल्ली" या विषयावर संशोधन कार्य केले असून सदरील अप्रकाशित शोधप्रबंध भारतीदासन विद्यापीठ तिरुपती येथे सादर केला. प्रस्तुत संशोधन तिरुचिरापल्लीमध्ये बांधकाम मजुरांचे रोजगार, उत्पन्न आणि आरोग्यावरील खर्च या संदर्भात विश्लेषण करून बांधकाम मजूर हे बांधकाम क्षेत्रामध्ये असताना होणाऱ्या गंभीर दुखापतीवरील त्यांचा खर्च भागवणे मिळणाऱ्या रोजगारात शक्य होत नसल्याचे दिसून आले. प्रस्तुत अभ्यासानुसार ८०.२ टक्के उतारदाते ग्रामीण भागातील होते, १२.९ टक्के अर्धशहरी आणि उर्वरित ६.९ टक्के शहरी होते. यामध्ये ५८.९ टक्के उत्तरदात्यांकडे स्वतःचे घर आहे, ३२.९ टक्के भाड्याच्या घरात राहत होते. सदरील अभ्यासात आरोग्य समस्या आणि खर्च संबंधित निष्कर्ष पाहता ९७.१ टक्के कामगारांना आरोग्याच्या समस्या अधिक होत्या.[१०]

प्रस्तुत संशोधन विषयावरून असे दिसून येते की, बांधकाम कामगार म्हणून रोजगाराची संधी मिळवण्यासाठी इतर क्षेत्रापेक्षा बांधकाम व्यवसायामध्ये रोजगाराच्या अधिक संधी आहेत म्हणून या व्यवसायाकडे कामगारांचा कल अधिक असल्याचे दिसून येते.

२. **अनन्या पात्रा (२०१९)** यांनी "रिप्रोडक्टिव हेल्थ चॅलेंजेस अँड कॉपिंग स्ट्रॅटर्जी ऑफ फिमेल कन्स्ट्रक्शन वर्कर" शीर्षकासह सामाजिक विज्ञानातील पीएच.डी. पदवीसाठी नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी राउरकेला विद्यापीठात सादरकेलेला अप्रकाशित शोधप्रबंध सदरील संशोधनामध्ये भारतातील महिला बांधकाम कामगारांच्या

अभ्यास केला असून भारतातील महिला पुरुषाच्या खांद्याला-खांदा लावून बांधकाम व्यवसायात सहभागी असल्याचे दिसून येते परंतु बांधकाम मजूर म्हणून काम करत असताना महिलांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते जसे प्रस्तुती रजा, समान वेतन नसणे, आरोग्याच्या समस्या, स्वच्छतागृह नसणे, वारंवार होत जाणारे विस्थापन, मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न इत्यादी समस्यात दिवसेंदिवस वाढत जात आहे. या समस्यांचा अभ्यास सदरील संशोधनामध्ये करण्यात आला. महिला बांधकाम मजूर यांना पुरुषांच्या तुलनेने अधिक समस्यांना सामोरे जावे लागते असे या अभ्यासातून दिसून आले. पुरुषाप्रमाणेच महिलांचे बांधकाम मजूर म्हणून काम करण्याचे प्रमाण ५० टक्के असल्याचे दिसून येते परंतु महिला बांधकाम मजुरांना फक्त मदतनीस म्हणूनच काम करत असल्याचे आढळून आले. त्यांना उच्च दर्जाचे काम दिले जात नाही हे अभ्यासांतीस आढळून आले. तसेच पुनरुत्पादक आरोग्याचे आव्हाने त्यांच्या पुढे उभे आहेत आणि शासकीय योजनांची उदासीनता असल्याचे दिसून येते.[११.] प्रस्तुत संशोधनावरून महिलांच्या संदर्भामध्ये इतर ठिकाणी ज्याप्रमाणे भेदभाव केला जातो त्याचप्रमाणे बांधकाम क्षेत्रात देखील महिलांना लैंगिक आणि आर्थिक भेदभावाला सामोरे जावे लागते असे दिसून येते.

३. **कुंभार दिलीप राजाराम (२००९)** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे विद्यावाचस्पती पदवीसाठी ‘इकॉनॉमिक कंडिशन ऑफ हाऊस कन्स्ट्रक्शन वर्कर्स इन कोल्हापूर सिटी’ या संशोधन विषयावर हा आर्थिक दृष्टिकोनातून अभ्यास केला. प्रस्तुत संशोधनांमध्ये कोल्हापूर शहरातील घरबांधणी कामगारांची आर्थिक स्थिती पाहता त्यांनी मुलाखत अनुसूचीच्याद्वारे उत्तरदात्याकडून माहितीच्या आधारे पुढील निष्कर्ष मांडले. बांधकाम मजूर कर्जबाजारी आहेत आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांच्या गुत्तेदारांनी दिलेल्या आगाऊच्या रोजंदारीवर अवलंबून असतात. याचा अर्थ ते गरिबीच्या मधोमध जगत आहेत ज्यात त्या वर्गांना गरिबीच्या बळींपासून वाचवण्यासाठी योग्य धोरणाची गरज आहे. प्रस्तुत उद्दिष्टे साध्य करण्याच्या दृष्टीकोनातून आणि गृहीतकांची चाचणी घेण्याच्या दृष्टीकोनातून, संकलित माहितीचे निरीक्षण, चर्चा आणि विश्लेषण करून प्रश्नावलीद्वारे नमुना सर्वेक्षणाच्या मदतीने संपूर्ण तपास केला गेला.[१२.] बांधकाम उद्योग हा हंगामी स्वरूपाचा आहे आणि वर्षातून ८ ते ९ महिने चालतो. त्यासाठी अंगमेहनतीची गरज आहे आणि कठोर

परिश्रम प्रामुख्याने करावे लागत आहेत. इतर काळात बांधकाम कामगारांना कामासाठी वणवण फिरावे लागते.

४. **सुब्रह्मण्यम शंकर (२०१७)** भारतातील बांधकाम कामगारांसाठी सामाजिक सुरक्षा आता पूर्वीपेक्षा जास्त का आवश्यक आहे. यासंबंधी संशोधन कार्य केले. भारताचा बांधकाम उद्योग देशाच्या विकासात एक मजबूत शक्ती म्हणून उभा आहे. लाखो लोकांना बांधकाम व्यवसाय रोजगार देतो. पायाभूत सुविधा आणि बांधकाम क्षेत्रातील ही भरभराट असूनही, कामगार दलाकडे अनेकदा दुर्लक्ष केले जाते, त्यांना अनेक असुरक्षिततेचा सामना करावा लागतो. ज्यांना त्यांचे कल्याण सुनिश्चित करण्यासाठी तातडीने लक्ष देणे आवश्यक आहे. बांधकाम कामगारांची दुर्दशा, इमारत आणि इतर बांधकाम कामगार कायदा (1996) आणि निधी-कामगार संहितेचा प्रभाव, मातृत्व संरक्षण आणि वृद्धापकाळ निवृत्तीवेतन, लिंग असमानता संबोधित करणे, बांधकाम कामगार बांधकाम कामगार असमानता आरोग्य सेवा, समान वेतन, इत्यादी समस्यांच्या स्वरूपाच्या अभ्यास केला.[१३.]

पूर्व संशोधन साहित्याच्या अभ्यासावरून असे दिसून येते की, बांधकाम कामगारांना विविध लैंगिक भेदभाव, सामाजिक, आर्थिक, आरोग्य इत्यादी समस्यांना सामोरे जावे लागते. याचा परिणाम बांधकाम कामगारांच्या सामाजिक जीवनावर अधिक होत असतो. म्हणून समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून बांधकाम कामगारांचे अध्ययन महत्वाचे ठरते.

संशोधनाचे महत्त्व :

कामगार वर्ग मोठ्या प्रमाणावर सामाजिकदृष्ट्या उपेक्षित घटक मानला गेलेला आहे. जागतिक स्तरावर सर्वाधिक कामगार वर्ग हा बांधकाम क्षेत्रामध्ये गुंतलेला असल्यामुळे त्यांना अनेक आर्थिक-सामाजिक समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे समाजातील एक मोठा घटक अन्याय-अत्याचाराला बळी पडत असल्याने बांधकाम कामगारांच्या सामाजिक समस्या अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत संशोधन विषयाची निवड करण्यात आलेली आहे. प्रस्तुत संशोधनानुसार आलेल्या विविध उपाययोजनांचे मूल्यांकन करता येईल. तसेच अस्तित्वात असलेल्या बांधकाम कामगारांसंबंधी योजनांचा व बांधकाम कामगारांच्या कल्याणासाठी करण्यात आलेल्या सरकारी पायाभूत योजनांची प्रभावी अंमलबजावणी होत आहे का नाही ते तपासता येईल त्याचबरोबर

योजनाकारांना कायदे निर्मितीसाठी व कामगारांच्या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी या संशोधनाची मदत होईल. या संशोधनाद्वारे येणाऱ्या शिफारशींचा योग्य अर्थ लावून बांधकाम कामगारांसाठी नवनवीन सुविधा पुरवण्यासाठी मदत होईल. त्यामुळे बांधकाम कामगारांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी मदत होईल.

समस्या सूत्रण :

बांधकाम कामगार हा सद्य:परिस्थितीमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध असणारा आणि जोखीमेचे काम करणारा मोठा वर्ग आहे. बांधकाम कामगार हा समाजातील अतिशय दुर्लक्षित घटक आहे. त्यांच्या समस्या आणि सामाजिक स्थान या दृष्टिकोनातून या दुर्लक्षित भागाचे संशोधन केले पाहिजे असे मला संशोधन अभ्यासावरून लक्षात आले. म्हणून 'बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ: लातूर जिल्हा)' या संशोधन समस्येची निवड करण्यात आली. बांधकाम कामगारांचे सामाजिकदृष्ट्या त्यांचे सामाजिक स्थान कसे आहे? सामाजिक उपेक्षित घटक असल्यामुळे त्यांना कोणत्या प्रकारची वागणूक दिली जाते? सरकारी योजना या त्यांचे सामाजिक स्थान उंचावण्यासाठी कोणत्या पद्धतीने मदत करतात? समाजातील वंचित घटक असल्यामुळे त्यांच्या सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी स्वतः कोणकोणते प्रयत्न केले जातात? या विविध कारणामुळे ही संशोधन समस्या निवडण्यात आली.

संशोधनाची उद्दिष्टे :

१. बांधकाम कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करणे.

२. बांधकाम कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढण्याची कारणे शोधणे.

३. लातूर जिल्हयाच्या विकासामध्ये बांधकाम कामगारांच्या सहभागाचे अध्ययन करणे.

४. बांधकाम कामगारांच्या सामाजिक समस्या सोडवण्यासाठी शासनातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

५. बांधकाम कामगारांचे सामाजिक स्थान तपासणे.

संशोधनाची गृहितके :

१. बांधकाम कामगार हे मेहनतीचे काम करत असल्यामुळे त्यांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते.

२. समाजाच्या सर्व स्तरातून बांधकाम व्यवसायाकडे मजुरांचा कल असल्यामुळे बांधकाम कामगारांच्या सामाजिक समस्या या विविध स्वरूपाच्या आहेत

३. बांधकाम कामगारांच्या सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शासनाकडून मदत केली जाते.

४. लातूर जिल्ह्याचा प्रगतीमध्ये बांधकामगारांचे महत्त्व असले तरीही त्यांना सामाजिकदृष्ट्या दुय्यम वागणूक दिली जाते

५. बांधकाम कामगारांची संख्या ही दिवसेंदिवस वाढत आहे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधनासाठी संख्यात्मक आणि गुणात्मक अशा मिश्र पद्धतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलनाचे तंत्रे :

प्रस्तुत संशोधन अभ्यासासाठी प्राथमिक तथ्य संकलन आणि दुय्यम तथ्य संकलन पद्धतीचा वापर करण्यात येईल. प्राथमिक तथ्य संकलनामध्ये मुलाखत अनुसूची आणि निरीक्षण या संशोधन पद्धतीचा वापर करण्यात येईल. तसेच दुय्यम तथ्य संकलन करण्यासाठी लागणारी माहिती संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्र, शोधप्रबंध, इंटरनेट, विविध प्रकाशित अप्रकाशित साहित्य इ. माहितीचा वापर करण्यात येईल.

नमुना निवड :

प्रस्तुत संशोधनासाठी गैर संभाव्यता संशोधन पद्धतीतील सहेतुक नमुना निवड पद्धतीचा वापर करण्यात येईल. संशोधनासाठी संशोधकाने मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याची निवड केलेली आहे. यामध्ये जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या समस्यांचा अभ्यास करण्यासाठी सहेतुक नमुना निवड पद्धतीद्वारे प्रत्यक्ष सर्वेक्षणासाठी लातूर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील 02 ग्रामीण वस्त्या याप्रमाणे जिल्ह्यातील एकूण 20 ग्रामीण वस्त्या निवडल्या जातील व त्या प्रत्येक वस्तीमधील 10 उत्तरदाते असे एकूण 200 उत्तरदाते व जिल्ह्यातील 05 शहरातील प्रत्येकी 20 उत्तरदाते याप्रमाणे 100 शहरी उत्तरदाते असे एकूण 300 उत्तरदात्यांची प्रत्यक्ष संशोधनासाठी निवड केली जाईल. तसेच संगणकाच्या SPSS सॉफ्टवेअरचा वापर करून त्या आधारे तथ्यांचे विश्लेषण आणि अर्थनिर्वचन करण्यात येईल.

संशोधन आराखडा:

संशोधन आराखडा हा संशोधन कार्य वस्तूनिष्ठ होण्यासाठी महत्वाचा असतो. प्रस्तुत संशोधन कार्य गतिमान होण्यासाठी आणि या अभ्यासातून येणारे अनुमान आणि निष्कर्ष अचूक असावेत म्हणून विश्लेषणात्मक संशोधन आराखड्याचा वापर करण्यात येईल.

संशोधनाची व्याप्ती:

प्रस्तुत 'बांधकाम कामगारांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ: लातूर जिल्हा)' या संशोधनात लातूर जिल्ह्यातील बांधकाम व्यवसायामध्ये समाविष्ट असलेल्या सर्व प्रकारच्या बांधकाम कामगारांचा समावेश डोळ्यासमोर ठेवून संशोधन करण्यात येणार असून त्यामध्ये बांधकाम कामगारांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी शासनामार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा अभ्यास करण्यात येईल. हे संशोधन लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगारांच्या सामाजिक समस्येवर दृष्टिक्षेप टाकण्यात येईल. त्यादृष्टीने संशोधनाची व्याप्ती असेल.

संशोधन मर्यादा

प्रस्तुत संशोधन हे बांधकाम कामगाराचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ: लातूर जिल्हा) आहे. बांधकाम कामगारांच्या समस्यांचा संशोधनामध्ये अभ्यास करण्यात येईल. सदरील संशोधनासाठी २०१२ ते २०२२ हा कालखंड निवडण्यात आला आहे. प्रस्तुत संशोधन हे लातूर जिल्ह्यातील बांधकाम कामगाराच्या समस्या कार्यापुरतेच मर्यादित राहील.

प्रकरणाची रूपरेषा :

प्रस्तुत संशोधान कार्य हे पुढील प्रमाणे प्रकरणाच्या आधारे विभागले जाईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना.

प्रकरण दुसरे : साहित्याचे पुनरावलोकन आणि संशोधन पद्धती.

प्रकरण तिसरे : बांधकाम कामगारांच्या सामाजिक स्थितीचे विश्लेषण.

प्रकरण चौथे : तथ्यांचे विश्लेषण.

प्रकरण पाचवे: निष्कर्ष व शिफारशी.

<u>संदर्भ सूची:</u>

१. थोरात. सुखदेव. आणि तागडे. नितीन. २००८. महाराष्ट्रातील विषमता आणि गरिबी संपत्तिक असमानता व जातीय भेदभावाचा प्रभाव, सुगावा प्रकाशन, पुणे. पृ.क्र.१२ ते २७

२. शिरसाठ, सतीश. २०१०. असंघटित कामगार, प्रौढ, निरंतर शिक्षण व ज्ञानविस्तार विभाग. सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे. पृ.क्र.२१

३. झेंडे, अनिल. २०२१. महाराष्ट्र बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाची बांधकाम कामगार सुधारणेतील भूमिका. पीएच.डी. अप्रकाशित शोध प्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ.क्र.१६

४. कित्ता पृ.क्र. २०.

५. भोर, बी.के. २०१६. पुणे जिल्ह्यातील विटभट्टी कामगारांचा आर्थिक व सामाजिक अभ्यास (वर्ष २००२ ते २०१२). अप्रकाशित शोधप्रबंध सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ. पुणे. पृ.क्र. २०१

६. कित्ता पृ.क्र.२२.

७. कित्ता पृ.क्र. ३८.

८. भारतीय जनगणना २०११.

९. भारत सरकार. सेकंड लेबर कमिशन रिपोर्ट.२०२१. पब्लिशड बाय डीईएस. नवी दिल्ली. पृ.क्र. ६२५

१०. रंगलक्ष्मी, एस. २०१९. “एम्प्लॉयमेंट इन्कम अँड हेल्थ केअर एक्सपेंडिचर ऑफ कन्स्ट्रक्शन वर्कर इन तिरुचिरापल्ली” अप्रकाशित शोधप्रबंध भारतीदासन विद्यापीठ, तिरुपती. पृ.क्र.५९

११. पात्रा, अनन्या. २०१९. रिप्रोडक्टिव हेल्थ चॅलेंजेस अँड कॉपिंग स्ट्रॅटर्जी ऑफ फीमेल कन्स्ट्रक्शन वर्कर. अप्रकाशित शोध प्रबंध नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी राउरकेला विद्यापीठ, राउरकेला पृ.क्र.१५९.

१२. कुंभार, दिलीप राजाराम. २००९. ‘इकॉनॉमिक कंडिशन ऑफ हाउस कन्स्ट्रक्शन वर्कर्स इन कोल्हापूर सिटी’, अप्रकाशित शोधप्रबंध शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर. पृ.क्र.२५५.

संशोधक

मंगेश रामराव झोले